( इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर )

१९९५- ३ एस. सी. आर. - ४४७

दिवाणी अपिलीय अधिकारिता

दिवाणी अपील क्रमांक २१३४-३५/१९७९.

मदनगोपाल

विरुद्ध

पी.के.ए. रामचंद्र मुदलियार (मृत) यांचे कायदेशीर प्रतिनिधी आणि इतर .

एप्रिल १८, १९९५

के. रामास्वामी आणि बी. एल. हंसारिया, न्यायमूर्ती

हिंदु कायदा : संयुक्त कुटुंबांच्या मिळकती - असा दावा करण्यात आला कि मिळकती संयुक्त कुटुंबाच्या मिळकती नव्हत्या आणि बंधू हे स्वतंत्र व्यवसाय करीत होते—तडजोड झाली-एका भावाचा मुलगा दीर्घ काळानंतर वाटणीचा दावा करत होता—असा निर्णय देण्यात आला कि तो हक्कदार नाही .

अपीलकर्त्यांचे वडील ‘जे’ आणि ‘जे’ चे भाऊ ‘आर’ आणि ‘एस ‘ हे सामाईक पूर्वज ‘ए’ यांचे वंशज आहेत. ‘एस.’ यांनी त्यांच्या भावाविरुद्ध, संयुक्त कौटुंबिक मालमत्तेतील हिस्सा वाटण्यासाठी दावा दाखल केला, ज्याने त्यांच्या लेखी जबाबात निवेदन केले की ते संयुक्त कुटुंबातील सदस्य नाहीत आणि मालमत्ता संयुक्त कुटुंबाच्या मालकीची नाही. मात्र, तडजोड झाली आणि ‘एस’ ला १३५० रुपयांची रक्कम मिळाली आणि तो बाहेर पडला.

त्यानंतर याचिकाकर्त्याचे आई-वडील यांच्यामध्ये वाद झाला आणि अपीलकर्ता आणि त्याची बहीण त्यांच्या आईसोबत राहू लागले. अपीलकर्त्याने वाटणीसाठी दावा दाखल केला आणि मालमत्तेच्या १/४ (एक चतुर्थांश) भागावर दावा करतांना असे म्हणणे मांडले की ती संयुक्त कौटुंबिक मालमत्ता आहे. त्यांचे काका ‘आर’ यांनी मनाईसाठी दावा दाखल केला. न्यायालयाने अपीलकर्त्याच्या बाजूने हुकूमनामा पारित करून खटला निकाली काढला आणि ‘आर’ यांनी दाखल केलेला खटला फेटाळून लावला. ‘आर’ यांच्या अपिलावर खंड न्यायाधीश मंडळाने न्यायचौकशी न्यायालयाचा आणि त्यामुळे हे अपील दाखल करण्यात आले आहे.

अपील फेटाळत ह्या न्यायालयाने पुढीलप्रमाणे निर्णय पारित केला.

१. अपीलकर्त्याच्या जन्मापूर्वीच, काही मालमत्ता संयुक्त कुटुंबाच्या नसल्याची भूमिका अपीलकर्त्याचे वडील व काका यांनी घेतली होती. अपीलकर्त्याच्या किंवा अपीलकर्त्याच्या इतर काकांच्या अधिकारांवर गदा आणण्याच्या हेतूने ही याचिका दाखल करण्यात आली होती, असे मानणे हे

अतिशय भोळसटपणाचे आहे.[४४९-ड ]

२. खटल्यातील मालमत्ता क्रमांक ३ आणि ४ मात्र संयुक्त कुटुंबातील असल्याचे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार अपीलकर्त्याला त्यात वाटा मिळण्याचा हक्क असेल. मनाई आदेश त्या दृष्टीने उचित ठरत नाही, [४४९-ई]

दिवाणी अपिलीय अधिकार क्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक २१३४-३५ / १९७९

मद्रास उच्च न्यायालयाच्या १०.१.७८ च्या न्यायनिर्णय व आदेशाविरुद्ध दाखल अपील क्रमांक ६२६/७० व ६१६ / १९७ ३ मधील प्रकरण.

याचिकाकर्त्यासाठी के.के. मणी.

उत्तरवादींसाठी एम. रघुरामन (एन.पी.)

न्यायालयाने खालील आदेश पारित केला.

मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने १० जानेवारी १९७८ रोजी अपील क्रमांक ६२६/७० आणि ६१६/७३ मध्ये दिलेल्या सामायिक निकालाविरुद्ध दाखल विशेष अनुमती याचिकेच्या मंजुरीवरून हे अपील दाखल झाले आहे. याचिकाकर्ते जयराम मुदलियार यांचे पुत्र आहेत. अरूणाचला मुदलियार हे सामाईक पूर्वज आहेत, म्हणजे त्यांचे आजोबा, रामचंद्र मुदलियार. अपीलकर्त्याचे वडील जयराम आणि त्यांचे काका शनमुगा मुदलियार हे अरुणाचल मुदलीयार यांचे पुत्र आहेत. ते व्यापारी कुटुंबातील सदस्य

आहेत यात शंका नाही. परंतु १९४७ च्या सुरुवातीला, शनमुगा मुदलियार या भावाने रामचंद्र मुदलियार व जयराम मुदलियार यांच्याविरुद्ध संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तेतील वाटा वाटून घेण्यासाठी दावा (ओ. एस. क्र. ११८/४७) दाखल केला. त्यामध्ये रामचंद्र मुदलियार आणि जयराम मुदलियार,अपीलकर्त्याचे वडील, यांनी लेखी जबाब दाखल करून आपण संयुक्त कुटुंबातील सदस्य नाही आणि त्या खटल्यात नमूद केलेल्या मालमत्ता संयुक्त कुटुंबातील नाहीत, असे कथन केले . मात्र, त्यांच्यात तडजोड झाल्याने शनमुगा मुदलियार यांना १३५० रुपयांची रक्कम मिळाली होती आणि ते प्रकरणातून बाहेर पडले होते.

१९५३ मध्ये अपीलकर्त्याची आई  राधा अम्मल आणि जयराम मुदलियार यांचे भांडण झाले आणि अपीलकर्ता आणि त्याची बहीण त्यांच्या आईसोबत राहू लागले. १९६५ मध्ये, अपीलकर्त्याने(ओएस क्रमांक १०६/६५) हा दावा दाखल केला आणि वादपत्रात नमूद केलेल्या मालमत्ता संयुक्त कुटुंबाच्या मालकीच्या आहेत  आणि त्याला त्यामध्ये १/४ वाटा मिळतो असे कथन करून मालमत्तेचे विभाजन आणि त्यातील १/४ हिस्सा मिळावा याकरिता दावा दाखल केला. त्यांचे काका रामचंद्र मुदलियार यांनी मनाई हुकूम प्राप्त करण्यासाठी दुसरा दावा (ओ.एस. क्रमांक ९६/६४) दाखल केला. न्यायचौकशी न्यायालयाने अपीलकर्त्याच्या बाजूने हुकूमनामा पारित केला आणि रामचंद्र मुदलियार यांचा दावा फेटाळून लावला. त्यावर असमाधानी असलेले पहिले उत्तरवादी रामचंद्र मुदलियार यांनी हे प्रकरण खंडपीठाकडे अपीलात नेले, ज्यांनी न्यायचौकशी  न्यायालयाचा आदेश बदलला, अपीलकर्त्याचा दावा फेटाळून लावला आणि उत्तरवादीच्या बाजूने हुकूमनामा पारित केला. अशा प्रकारे विशेष अनुमतीद्वारे ही अपील दाखल करण्यात आली .

याचिकाकर्त्यांचे विद्वान वकील श्री. के. के. मणी यांनी उपस्थित केलेला मुक्या युक्तिवाद असा आहे कि, न्यायचौकशी न्यायालयाने ही मालमत्ता संयुक्त कुटुंबाची आहे आणि जयराम मुदलियार आणि रामचंद्र मुदलियार हे व्यापारी कुटुंबातील सदस्य आहेत निष्कर्ष काढत असल्यामुळे ही मालमत्ता संयुक्त कुटुंबातील सदस्यांकडून संपादित केली गेली आहे असे मानले जावे. परिणामी, अपीलकर्ता, जयराम मुदलियार यांचा मुलगा असल्याने, संयुक्त कौटुंबिक मालमत्तेत १/४ वाट मिळण्यास हक्कदार आहे. उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद या एका वास्तव्याच्या आधारे फेटाळून लावला आहे की १९४७ च्या सुरुवातीला, म्हणजे अपीलकर्त्याच्या जन्मापूर्वीच, त्याच्या वडिलांनी त्यांचे बंधू रामचंद्र मुदलियार यांच्यासमवेत अशी भूमिका घेतली होती की, ते संयुक्त कुटुंबातील सदस्य नाहीत आणि ते प्रत्येक जण स्वतंत्रपणे व्यवसाय करीत आहेत आणि म्हणूनच, अपीलकर्ता संयुक्त कुटुंबातील सदस्य आहे की नाही या प्रश्नावर विचार करणे फारच निरुपयोगी आहे.

उच्च न्यायालयाने त्या निष्कर्षाप्रत पोहोचणे योग्य आहे, असे आम्हाला वाटते. अपीलकर्त्याची आई राधा अम्मल आणि अपीलकर्त्याचे वडील जयराम मुदलियार यांच्यात वाद निर्माण झाल्यांनतर अशी याचिका आपल्या भावासोबत केली गेली असती, तर काही तरी सांगता येईल, असे आपण समजू शकतो. परंतु अपीलकर्त्याच्या जन्मापूर्वीच संयुक्त कुटुंबातील सदस्य नसल्याची भूमिका घेण्यात आली होती. याचिकाकर्त्याच्या किंवा शनमुगा मुदलियार यांच्या अधिकारांवर गदा आणण्याच्या हेतूने ही याचिका दाखल करण्यात आली होती, असे मानणे अत्यंत चुकीचे आहे. या पार्शवभूमीवर पुढील प्रश्नात जायची गरज नाही.

मात्र उच्च न्यायालयाने दाव्यातील मालमत्तेतील क्र. ३ आणि ४ येथे नमूद मालमत्ता संयुक्त कुटुंबातील असल्याचे म्हटले आहे. न्यायचौकशी न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार अपीलकर्ता त्यामध्ये हिस्सा मिळण्यास हक्कदार होईल. त्या दृष्टीने मनाई आदेश लागू होत नाही.

त्यानुसार अपील फेटाळले जाते. खर्चाबाबत आदेश नाही.

जी. एन. अपिले फेटाळली.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x